ePaper महाराष्ट्र दुष्काळाने होरपळतोय, सरकार मराठा-ओबीसी वाद लावण्यात व्यस्त : नाना पटोले

| वर्ष - 7 | अंक - 193 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत


- किंग विराट कोहलीचा मोठा निर्णय!
- धनुष्यच्या मुलावर पोलिसांची कारवाई!
- अनिल अंबानींच्या कंपनीचं दिवाळं!
- लाठीचार्ज कुणाच्या आदेशाने


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 21 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सरकारला सुबुद्धी मिळो!

## » मनोज जरांगे-पाटील : मराठा आरक्षणासाठी तुकोबांच्या चरणी प्रार्थना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला आरक्षण देण्याची सद्बुद्धी सरकारला द्यावी, अशी प्रार्थना मनोज जरांगे पाटील यांनी तुकाराम महाराजांच्या चरणी केली. सोमवारी (दि. 20) मध्यरात्री त्यांनी देहूगावचा दौरा केला. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज मंदिरात तुकोबांचे दर्शन घेत साकडे घातले.**



देहू सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचे देहुनगरीत जंगी स्वागत करण्यात आले. जेसीबीमधून फुलांची उधळण करत त्यांचा सत्कार झाला. त्यानंतर जरांगे पाटील यांनी कोपरा सभा घेत समाज बांधवांना मार्गदर्शन केले.

जरांगे पाटील येणार असल्याने रविवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून देहूनगरीत मराठा बांधव जरांगे पाटील यांच्या आगमनाची वाट पाहत होते. मध्यरात्री त्यांचे आगमन झाले. त्यानंतर जरांगे पाटील यांना भलामोठा हार घालून त्यांचा सत्कार केला. ही सभा रात्री उशीरा दिड वाजे पर्यंत चालली. या वेळी देहू पंचक्रोशीतील सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

> "जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या चरणी नतमस्तक झालो. मराठा समाजाला आरक्षण देण्याची सद्बुद्धी सरकारला द्यावी, हे साकडं तुकोबांच्या चरणी घातले. आरक्षण मिळण्याची संधी आली आहे. आंदोलनाला गालबोट लागेल असे कोणतेही कृत्य मराठा समाजाने करू नये.
>
> - मनोज जरांगे-पाटील, मराठा आंदोलक.

या कार्यक्रमाचे आयोजन नगरसेकव योगेश काळोखे, प्रवीण काळोखे, सचिन हगवणे, स्वप्रील स्वप्रील काळोखे, अजित काळोखे, प्रशांत काळोखे, गोरख काळोखे, ओंकार काळोखे, विवेक काळोखे, सनी काळोखे, स्वप्रील हगवणे, सुदर्शन काळोखे, अमोल मोरे, किशोर आवळे, बंटी मुसुडगे, अनिकेत काळोखे, गणेश मराठे, निखील मराठे, शुभम शेवाळे, दिपक काळोखे व सकल मराठा समाजाने केले होते.

२४ डिसेंबरनंर दिशा ठरवू...
सरकारने आरक्षणा बाबत 24 डिसेंबर ही तारीख दिली आहे. 24 डिसेंबर पर्यंत आरक्षण मिळाले नाही तर पुढची दिशा ठरवू. मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही. यापुढे मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना योग्य भाषेत उत्तर दिले जाईल, असेही जरांगे-पाटील यांनी यावेळी सांगितले.

# वायू प्रदूषणाबाबत उपायोजना करा!

## » जनसंवाद सभा: महापालिका प्रशासनाला नागरिकांच्या सूचना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील वायू प्रदूषणावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात आणि शहरातील वाढत्या रहदारीचे योग्य नियोजन करावे अशा सूचना नागरिकांनी जनसंवाद सभेत महापालिका प्रशासनाला केल्या.**



महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांत करण्यात येते. यावेळी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या सोमवारच्या ऐवजी तिसऱ्या सोमवारी म्हणजे आज जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले.

सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण 58 तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे 13, 7, 4, 5, 4, 5, 8, आणि 12 तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर, विजयकुमार सरनाईक यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, उमेश ढाकणे उपस्थित होते.

### नागरिकांच्या विविध तक्रारी...

» जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये मुख्यत्वे शहरातील वायू प्रदूषणावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात आणि शहरातील वाढत्या रहदारीचे योग्य नियोजन करावे अशा सूचनांचा समावेश होता. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम वेगाने करावे, शहर परिसरात वेळोवेळी किटकफवारणी करण्यात यावी या सूचनाही नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

# धीरेंद्र शास्त्रींना 21 लाखांचे बक्षीस देऊ!

## » पुण्यात अंनिसचं बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्रींना आव्हान


। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबा यांच्यावर सत्संग व दरबाराच्या माध्यमातून अवैज्ञानिक आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी वक्तव्ये व कृती केल्याचा आरोप केला आहे. तसेच धीरेंद्र शास्त्रींनी ते करत असलेले दावे सिद्ध करावेत. आम्ही त्यांना २१ लाख रुपयांचं बक्षीस देऊ, असं खुलं आव्हान दिलं आहे. याबाबत महा. अंनिसचे पूर्णवेळ कार्यकर्ते विशाल विमल यांनी निवेदन जारी करत संघटनेची भूमिका स्पष्ट केली.**

विशाल विमल म्हणाले, “बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबा सत्संग व दरबाराच्या माध्यमातून अशास्त्रीय, अवैज्ञानिक, घटनात्मक तरतुदीविरोधी भाष्य आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी वक्तव्ये, कृती, दावे करत असतात. त्याला महा. अंनिसने आक्षेप घेऊन बाबांवर गुन्हा नोंदवून कारवाई करण्याची मागणी शासन यंत्रणेकडे केली.

तसेच बाबा जे अशास्त्रीय, अवैज्ञानिक, वक्तव्य, दावे, कृती करत आहे, त्यासंबंधी बाबांनी सोयीच्या ठिकाणी, नियंत्रित परिस्थितीत आणि वकील, पोलीस अधिकारी, निवडक कार्यकर्ते, विविध क्षेत्रतील निवडक तज्ज्ञ मंडळींच्या कमिटीसमोर दावे, कृती सिद्ध करावेत. बाबांना २१ लाखांचे बक्षीस दिले जाईल, असे आव्हान बाबांना महा. अंनिसने वेळोवेळी दिले. मात्र, ते आव्हान बाबा लेखी स्वरूपात स्वीकारत नाहीत. पुण्यात सोमवार ते बुधवार या तीन दिवस बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबांचा सत्संग व दरबार कार्यक्रम होत आहे. त्या पार्श्वभूमीवर बाबांनी सोमवारी (२० नोव्हेंबर) पत्रकार





परिषदेत महा. अंनिसने दिलेल्या आव्हान प्रक्रियेसंबंधी दिशाभूल करणारी वक्तव्ये केल्याचे प्रसारमाध्यमातून समजले. ते म्हणाले की, त्यांच्या दरबारामध्ये या, तुमचे काय म्हणणे आहे ते मांडा. आपण दूध का दूध आणि पाणी का पाणी करू, एकदाच आमने-सामने होऊन जाऊ द्या. मात्र, सोशल मीडियावर बाबांचे जे भक्त हिंसक प्रतिक्रिया देतात, स्वतः बाबाही अशास्त्रीय, असंवैधानिक, अवैज्ञानिक, अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे, चितावणीखोर आणि भडकावून वक्तव्य करतात. त्यामुळे आक्षेप, खुलासे, दाव्यांची सिद्धता दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी शांततेत कशी होऊ शकते?”, असा प्रश्न विशाल विमल यांनी विचारला.

विशाल विमल पुढे म्हणाले, “उलट दरबारात आमने सामने आल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वस्तुस्थिती पाहता बाबांच्या दरबारात अथवा सत्संगाच्या ठिकाणी कायदा सुव्यवस्था पाळण्याची जबाबदारी असणारी शासन यंत्रणा, पोलीस यंत्रणा आणि खुद्द बाबाही आमने-सामने वक्तव्य आणि दाव्यांची सिद्धता चाचणी पार पाडू शकत नाहीत. त्यामुळे दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी आमने-सामने यावे असे म्हणणे ही बाबांनी काढलेली पळवाट आहे. महा. अंनिसने आजवर विविध धर्मीय बुवाबाबा, अम्मा आणि ताईंच्या अशास्त्रीय दाव्यांचा पर्दाफाश केला आहे. अनेक बाबांना आव्हान देऊन त्यांची सिद्धता चाचणी घेऊन त्यांचे दावे खोटे असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे धीरेंद्र शास्त्री बाबा करत असलेले दावे त्यांनी सिद्ध करण्याचे महा. अंनिसचे आव्हान स्वीकारावे. आव्हान स्वीकारल्याचे लेखी द्यावे. महा. अंनिस बाबांच्या संबंधी जी भूमिका घेत आहे ती संवैधानिक आहे. त्यामुळे शासन व्यवस्थेने या प्रकरणाकडे केवळ बघ्याच्या भूमिकेतून न पाहता, पुढाकार घेऊन नियंत्रित परिस्थितीत दाव्यांची सिद्धता चाचणी आयोजनात सहभाग दर्शवावा. बाबांनी सोयीच्या ठिकाणी, नियंत्रित परिस्थितीत आणि वकील, पोलीस अधिकारी, निवडक कार्यकर्ते, विविध क्षेत्रतील निवडक तज्ज्ञ मंडळींच्या कमिटीसमोर दावे, कृती सिद्ध करावेत. आम्ही पुन्हा बाबांना आव्हान देत आहोत. संघटनेच्यावतीने लवकरच बाबांशी पत्रव्यवहार केला जाणार आहे. राज्यात सोईच्या ठिकाणी नियंत्रित परिस्थितीत दावे सिद्ध करण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी अंनिस तयार आहे. बाबांनी दावे सिद्ध केल्यास २१ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल,” असंही विशाल विमल यांनी नमूद केलं.

### धीरेंद्र शास्त्रींकडून दिशाभूल

» पुण्यात सोमवार ते बुधवार या तीन दिवस बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबांचा सत्संग व दरबार कार्यक्रम होत आहे. त्या पार्श्वभूमीवर बाबांनी सोमवारी (२० नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत महा. अंनिसने दिलेल्या आव्हान प्रक्रियेसंबंधी दिशाभूल करणारी वक्तव्ये केल्याचे प्रसारमाध्यमातून समजले. आपण दूध का दूध आणि पाणी का पाणी करू, एकदाच आमने-सामने होऊन जाऊ द्या. मात्र, सोशल मीडियावर बाबांचे जे भक्त हिंसक प्रतिक्रिया देतात, स्वतः बाबाही अशास्त्रीय, असंवैधानिक, अवैज्ञानिक, अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे, चितावणीखोर आणि भडकावून वक्तव्य करतात. त्यामुळे आक्षेप, खुलासे, दाव्यांची सिद्धता दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी शांततेत कशी होऊ शकते?”, असा प्रश्न विशाल विमल यांनी विचारला.

# जरांगेंचा सरकारला निर्वाणीचा इशारा!

## » आमच्या हक्काचे आरक्षण पाहिजे : जरांगे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मनोज जरांगे यांना लेखी टाईम बॉन्ड देण्यासाठी येणाऱ्या शिष्टमंडळाकडून फक्त तारीख पे तारीख दिली जात असल्याचे चित्र आहे. आपण आजचं सरकारमधील काही मंत्र्यांना थेट फोन करून याबाबत जाब विचारणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. तर, टाईम बॉन्ड देणार की नाही याबाबत आज सरकारला शेवटचं विचारणार असल्याचे जरांगे म्हणाले. त्यामुळे टाईम बॉन्डवरून सरकार आणि जरांगे पुन्हा एकदा आमने-सामने येण्याची शक्यता आहे.**

राज्यात आतापर्यंत 29 लाख नोंदी सापडल्याचा दावा देखील मनोज जरांगेनी केला आहे. पुण्यातील खराडी भागात आज मनोज जरांगेंची सभा झाली. या सभेत ते बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, 1805 पासून 1967 पर्यंत आणि सगळे पुरावे शोधण्याचे काम सुरू झाले आहे. ओबीसी प्रवर्गत मराठे असल्याचं समोर आले आहे. राज्यात आतापर्यंत 29 लाख नोंदी सापडल्या आहेत. मग जर मराठा आरक्षणात येतो. तर 70 वर्षांपासून मराठ्यांचे कुणी वाटोळं केले याचे उत्तर द्या. आरक्षण कुणी मिळू दिल नाही त्याचं नाव आम्हाला द्या. आमचं भविष्य यांनी पूर्ण उध्वस्त केले आहे. आम्हला 70 वर्षा आधी आरक्षण दिलं असते तर जगात प्रबळ जात म्हणून एक नंबरला मराठे राहिले असते. आमचा नोकरीतला टक्का घसरला आणि ज्याची लायकी नाही त्याच्या हाताखाली काम करण्याची वेळ आमच्यावर आली. मराठा आरक्षणची लढाई खूप वर्षांपासून सुरू आहे. अनेकांनी टोकाची झुंज दिली आहे. मराठ्यांना आरक्षण मिळेपर्यंत सरकारला आता बिलकुल सुट्टी नाही, आमच्या हक्काचे आरक्षण आम्हाला पाहिजे.




### आपली लढाई आपल्याला लढायची

» समाज यांच्यासाठी राबला आणि याना मोठे केले. एकही नेता तुमच्याकडे बघायला तयार नाही आता तरी जागे व्हा. आपल्या लेकरांच्या आक्रोश ऐकायाला आता कुणी राहिला नाही. कुणाची मदत आपल्याला होणार नाही. ज्यांना आपण मोठे केले तो आपल्यासमोर उभा आहे आणि म्हणतोय आरक्षण मिळू देणार नाही त्यामुळे जागे व्हा, आपली लढाई आपल्याला लढायची आहे असे देखील जरांगे या वेळी म्हणाले.

# राज्यात पुढील तीन दिवस गारठ्याचे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।


राज्यभरात कोरडे वातावरण आहे. पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागांत किमान तापमानात सरासरी दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यावर सध्या कोणतीही हवामान विषयक स्थिती कार्यरत नाही. राज्यभरात कोरडे हवामान आहे. त्यामुळे गुरुवार, २३ नोव्हेंबरपर्यंत किमान तापमानात घट होण्याचा कल कायम राहील. सरासरी दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात गारठा जाणवेल. गुरुवारी, २३ नोव्हेंबरपासून राज्यात आग्नेय दिशेने येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याचा वेग वाढेल. या वाऱ्यांसोबत बाष्पयुक्त



वारे राज्यात येतील. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात कमाल तापमानात वाढ होईल. दक्षिण आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण निर्माण होण्याचा अंदाज आहे. शुक्रवारी, २४ नोव्हेंबर रोजी दक्षिण आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी पहाटे धुके पडण्याची शक्यता आहे. रविवारी राज्यात सर्वात कमी १४.० अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद जळगावात झाली आहे, तर सर्वाधिक ३५.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद रत्नागिरीत झाली आहे.

# चाकणमध्ये छकडी शर्यतीचा थरार!

## » तब्बल 600 बैलगाडा सहभागी : आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन



“ दिबैलगाडा शर्यत आणि महाराष्ट्रातील शेतकरी, भूमिपूत्रांचे अतूट नाते आहे. बैलगाडा शर्यतबंदी उठवण्यासाठी सुरू केलेल्या लढ्याला अखिल भारतीय बैलगाडा संघटनेसह सर्वच संस्था, संघटना आणि शर्यतप्रेमींनी योगदान दिले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या लढ्याला मोठे पाठबळ दिले. हा शेतकऱ्यांचा थरारक खेळ टिकला पाहिजे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण अर्थचक्र सक्षम होत असल्यामुळे केलेल्या प्रयत्नांचे चीज झाल्याचे समाधान वाटते. स्पर्धा आयोजकांने आभार व्यक्त करतो.

**- महेश लांडगे,**
**आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तब्बल ६०० छकडी बैलगाडा आणि सुमारे ७० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत चाकणमधील घाटावर भारतातील सर्वात मोठी छकडी बैलगाडा शर्यतीचा थरार पहायला मिळाला. कात्रज, पुणे येथील निसर्ग गार्डनच्या सुंदर आणि हरण्या जोडीने मानाचा ‘महान भारतकेसरी’ किताब पटकावला आणि थार गाडी मिळवली.**



पिंपरी-चिंचवडमधील भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त विकास नाईकवाडी यांच्या पुढाकाराने पुणे जिल्ह्यात प्रथमच छकडी शर्यत (बैलगाडा) स्पर्धा आयोजित करण्यात आली. चाकण येथील बैलगाडा घाटावर "महान भारतकेसरी" शर्यती अत्यंत उत्साहात पार पडली.

या स्पर्धेसाठी मध्यप्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश आदी राज्यांमधून गाडामालक सहभागी झाले. थार गाडी, टेम्पो, ट्रॅक्टर, ७० दुचाकी अशा भव्य बक्षीसांची उधळण यानिमित्ताने करण्यात आली. एकूण ६०० छकडी आणि सुमारे ७० हजार बैलगाडा प्रेमींनी या स्पर्धेचा प्रत्यक्ष घाटात आनंद घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील सर्वात मोठी ही स्पर्धा ठरली आहे.

विकास नाईकवाडी म्हणाले की, राज्यातील बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. त्याला राज्यातील कानाकोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू केलेल्या या लढ्याला यश मिळाले. सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवली. त्यामुळे बैलगाडा शर्यतप्रेमी आणि शेतकऱ्यांमध्ये आमदार लांडगे यांच्याबाबत आदराची भावना आहे. त्यामुळेच आम्ही यावर्षी भारतातील सर्वात मोठी छकडी बैलगाडा शर्यत अर्थात महान भारत केसरी स्पर्धा भरवली. त्याला अपेक्षेप्रमाणे मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

» प्रथम क्रमांक : निसर्ग गार्डन, कात्रज, पुणे (संदर आणि हारण्या), २- महालक्ष्मी प्र. विटा (बब्या आणि बावऱ्या), ३- भैरवनाथ प्र. बापुरसाहेब भाडळे वाघोली, उमेश शेठ फुरसुंगी (सरपंच आणि २२११ पिस्टन), ४- स्वामी साई सचिन घरत मोहीलशेठ धुमाळ, सुसगाव (बकासूर आणि सर्जा), ५- जोतिर्लिंग जितेंद्रशेठ देशमुख (लेंगरे) (चिक्या आणि वादळ), ६- स्वराज घिगे नाच्या ग्रुप मोशी (बलमा आणि लक्ष्मणराव), ७-श्रावणी दत्ता शिंदे (पाटखळ) (शिवराज आणि राजा), ८- आईगावदेवी प्र. रणवीर राहुलभाई पाटील (आ. कल्याण) (सिकंदर आणि वायर), ९-चेंडू ग्रुप मंगळापूर नेवसा अमोलशेठ ढगे (हारण्या आणि चिमण्या), १०- पै. सचिनशेठ चव्हाण, वाई (८८१)(सिकंदर आणि वायर).

---

# भंडारा डोंगर मंदिरासाठी सव्वाकोटींचा निधी!

## » संत तुकाराम साखर कारखान्याचा पुढाकार : ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांनी मानले आभार

“ भंडारा डोंगरावरील जगद्गुरू संत तुकाराम महाराज मंदिरासाठी संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याने दिलेल्या देणगीबद्दल संचालक, सभासद व कामगारांचे कौतुक आहे. तसेच भंडारा डोंगर मंदिरासाठी दानशूर व्यक्ती, संस्थांनी मदतीसाठी पुढे यावे.

**– शांतीब्रम्ह ह.भ.प. मारोती महाराज कुऱ्हेकर..**

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या शेतकरी ऊस बिलातून कपात केलेले एकोणपन्नास लाख चौऱ्याऐंशी हजार रुपये व कारखान्यातील सर्व कायम कामगार व हंगामी कामगार यांचे १५ दिवसांचे वेतन पंच्याहत्तर लाख पंधरा हजार रुपये असे मिळून सव्वाकोटी रुपयांचा धनादेश भंडारा डोंगरावर सुरु असलेल्या बांधकामासाठी भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात आला.**




इथेनॉल प्रकल्प भूमीपूजन व गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी कारखान्याचे चेअरमन विदुरा नवले, व्हाईस चेअरमन बापूसाहेब भेगडे, माजी आमदार कृष्णराव भेगडे, शांतीब्रम्ह ह.भ.प. मारोती महाराज कुऱ्हेकर, खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री बाळा भेगडे, माजी आमदार विलास लांडे, सर्व संचालक मंडळ व कामगार प्रतिनिधी यांचे हस्ते भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशिद व पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला. दरम्यान, ट्रस्ट तर्फे संत तुकाराम महाराज पगडी, मंदिर प्रतिकृती, शाल, श्रीफळ देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांनी सांगितले, की सध्या मंदिराचे बांधकाम प्रगतीपथावर असून, बांधकाम स्लॅब लेव्हलपर्यंत आले आहे. या बांधकामासाठी अंदाजित दीडशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. समाजातील अनेक दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून ट्रस्टला देणगी मिळत आहे. संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून मिळालेल्या देणगीची मंदिराच्या बांधकामासाठी मोठी मदत होणार आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, संस्थांनी पुढे येऊन मंदिराच्या बांधकामासाठी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# राबणारे राबतील नाही तर मरतील..!




**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मनरेगा हे काँग्रेसच्या गेल्या ६० वर्षांतील अपयशाचं जिवंत उदाहरण वाटत असलं तरी नुकत्याच झालेल्या एका पाहणीमध्ये मराठवाड्यातील ४२ टक्के शेतकऱ्यांनी त्यांची मदार रोजगार हमी योजनेवर असल्याचं सांगितलं. ती वगळली तर काय आहे अर्थचित्र? कसे जगतात लोक? त्यांनी कायम भुकेलेलं, तहानलेलंच रहावं अशी व्यवस्था आपल्याकडे का आहे?**

माझी राजकीय आकलनशक्ती असं सांगते की, 'मनरेगा' कधी बंद नका करू. कारण गेल्या ६० वर्षांतील तुमच्या राजकीय अपयशाचं ते जिवंत उदाहरण आहे. त्यामुळे ही योजना वारंवार सांगितली जाईल. आणि हो, देशहितासाठी त्यात बदलही होतील." पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हिंदी भाषणामुळे संसदेमध्ये तेव्हा सत्ताधारी काँग्रेसचे नेते कानकोंडे झाले होते.



भाजपच्या खासदारांमध्ये तर आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. बरं झालं, काँग्रेसच्या नेत्यांना असं कोणी तरी सुनवायला पाहिजेच होतं, अशी तेव्हा सार्वत्रिक भावना होती. सुमित्रा महाजन तेव्हा लोकसभेच्या अध्यक्षा होत्या. २०१४-१५ मधील या भाषणाची आठवण आता निघण्याचं कारणही तितकंच महत्त्वाचं. अलीकडेच 'अर्थ ग्लोबल' या संस्थेनं मराठवाड्यात दुष्काळी पट्ट्यात उत्पन्न घटलेल्या शेतकऱ्यांचं एक सर्वेक्षण केलं. त्यात उत्पन्न भरून काढायचं असेल तर काय कराल, असा प्रश्न विचारला गेला आणि ४२ टक्के शेतकऱ्यांनी सांगितलं, रोजगार हमी हाच पर्याय! एखाद्या योजनेची उपयोगिता आणि त्याचे राजकीय अर्थ यात नक्की अंतर किती, याचं हे उदाहरण. मराठवाड्यातील दुष्काळस्थिती आणि त्याचं सरकारी भाषेतील 'ग्राउंड ट्रुथिंग' करण्याचं काम सध्या सुरू आहे. काही दिवसानं सारे पीक काढून झाल्यावर दुष्काळासाठी केंद्र सरकारकडे मदत मागितली जाईल, मग केंद्र सरकार पुन्हा एकदा दुष्काळ पाहणीसाठी एक चमू पाठवेल. मग कदाचित हेक्टरी मदत जाहीर होईल, हे सगळं गणित मराठवाड्यातील जनतेसही आता पाठ झालं आहे. २०१८ पर्यंत पावसाची सरासरी ८७ टक्के एवढीच राहिली. या १२ वर्षांत नक्की काय घडलं? २०१२ मध्ये ६९ टक्के, २०१४ मध्ये ५३ टक्के, २०१५ मध्ये ५६ टक्के, २०१८ मध्ये ६४ टक्के एवढाच पाऊस झाला. याच काळात ऐन काढणीच्या काळात पाच वेळा अतिवृष्टी झाली. आठ वेळा गारपीट झाली. एवढा बर्फ पडला की दुष्काळी मराठवाड्यात हातातोंडाशी आलेलं पीक वाया गेलं. पुढे मराठवाड्यासह विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातही गारपीट झाली. हवामान बदलाचा मोठा फटका सहन करणाऱ्या मराठवाड्यातील माणूस पार पिचून गेला. त्यामुळे त्याला जगण्यासाठी रोजगार हमी हाच अजूनही पर्याय वाटतो, हे सत्य 'अर्थ ग्लोबल'च्या सर्वेक्षणातून पुढे आलं. रोहयो नसेल तर दुसरा पर्याय असतो कर्ज घेण्याचा. मित्रांकडून उसनवारीचे पर्याय संपल्यावर सासुरवाडीकडून, त्यानंतर इतर नातेवाईकांकडून उधार घ्यायचं आणि दिवस भागवायचे. सर्वेक्षणातील शंभरपैकी ३१ जणांनी घटलेल्या उत्पन्नातून मार्ग काढण्यासाठी नवं कर्ज घेण्याशिवाय पर्याय नसल्याचं सांगितलं आहे. गेल्या काही वर्षांत पीक कर्जाचं प्रमाण वाढतं आहे, असा सरकारचा दावा खरा असं गृहीत धरलं तरी दरवर्षीच्या नैसर्गिक संकटाला तोंड देण्यासाठी ते पुरेसं नाही, हेही आता स्पष्ट झालं आहे. एक अहवाल सरकारी कर्मचाऱ्यांनी केला. माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी तो सरकारला सादर केला. त्यात एक लाखाहून अधिक शेतकरी आत्महत्या करण्याच्या विचारात आहेत आणि तीन लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या मनात एकदा तरी आत्महत्या करण्याचा विचार डोकावून गेला, असं निरीक्षण समोर आलं. हे सारं सरकारदरबारी लिखित स्वरूपात आहे. पण घडतं असं की, एवढा संवेदनशील अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्याला एका क्षणी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारावी लागते. वातावरण बदलाचे परिणाम एवढे घातक असले तरी त्यावरच्या उपाययोजना मात्र होतच नाहीत. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचंच उदाहरण घेऊ. फुलंब्री तालुक्यातील एका शेतकऱ्याने रोजगार हमीची विहीर मंजूर करण्यासाठी कोण, कशी टक्केवारी घेतो, हे जाहीरपणे सांगितलं. प्रत्येक विहिरीमागे ३० टक्के कमिशन घेतलं जातं, याची चर्चा समाजमाध्यमांमध्ये झाली, पण विधिमंडळात रोजगार हमीमध्ये काही सुधारणा झाल्या नाहीत.

## संपादकीय »

### राज्य पेटावे

***अधिकृतपणे असे म्हणायचे कारण सध्या भुजबळ यांच्यामागे भाजपचे अनधिकृत बळ नाही, असे कोणी ठामपणे म्हणत नाही.***

मराठा-'ओबीसी' आरक्षणाच्या निमित्ताने छगन भुजबळ यांच्यातील फक्त वक्ताच जागा झाला असता तर त्याची इतकी दखल घेण्याचे कारण नव्हते. भुजबळ यांचे भाषण म्हणजे एकपात्री प्रयोग असतो. या वेळी अनेक पात्रांचा समाचार घ्यावयाचा असल्याने त्यांचा हा प्रयोग चांगलाच रंगला. हे सर्व मनोरंजनापुरतेच मर्यादित राहिले असते आणि राहणार असते तर त्यांच्यातील वक्तादशसहस्रेषुविषयी चार बरे शब्द बोलता आले असते. तथापि सद्य परिस्थितीत तसे करणे ही कर्तव्यच्युती ठरेल. तेव्हा भुजबळांच्या भाषणातील फोले पाखडण्याची चर्चा होत असली तरी त्यातील सत्त्व निवडून त्यावर भाष्य करणे आवश्यक ठरते. मराठा आणि ओबीसी संघर्ष रस्त्यावर सुरू झाला तर त्यात भुजबळादी नेते आपल्या मंत्रीपदाच्या शासकीय इतमामात सुरक्षित राहतील. पण ज्या अश्राापांची डोकी विनाकारण फुटतील; त्यांचे काय? रिकाम्या हातांशी स्पर्धा करणारी डोकी भडकावणे नेहमीच सोपे असते.

**तपास यंत्रणांचा वापर करून तर कधी आपल्याशी 'एकनिष्ठ' असलेल्या राज्यपालांकरवी विरोधी पक्षांना नामोहरम करायचे हा भाजपचा खेळ आता मतदारांना समजू लागला आहे. त्यामुळे आता चिंता करण्याची वेळ विरोधकांवर नाही, तर भाजपवर आली आहे. सध्या सुरू असलेल्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील भारतीय संघाच्या दमदार कामगिरीचे श्रेय मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिले, तर त्यासाठी मोदींनाच जबाबदार धरू शकाल का?**

# बाजी उलटण्याची वेळ आलीय!

मात्र ईडीने स्वत:चा खरा रंग दाखवत भूपेश बघेल, यांच्यासारख्या छत्तीसगडच्या लोकप्रिय मुख्यमंत्र्याविषयीची गोपनीय माहिती फोडली. तीसुद्धा त्या राज्यात मतदान सुरू होण्याच्या मुहूर्तावरच, तर मात्र मी या कृतीची गणती अतिशय गलिच्छ राजकारणात करेन. मुष्टियुद्धात एखाद्या खेळाडूने प्रतिस्पर्ध्याच्या कमरेखाली हल्ला केला, तर हल्ला करणारा खेळाडू अपात्र ठरतो. मग अशाच स्वरूपाच्या कृतीला निवडणुकांत (ज्या आता एखाद्या रक्तपात घडवणाऱ्या क्रीडाप्रकारापेक्षा कमी राहिलेल्या नाहीत) परवानगी कशी काय दिली जाते? बघेल यांच्या प्रकरणाबाबत काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे हस्तक्षेपाची मागणी केली आहे. निष्पक्ष आणि अतिशय पवित्र समजला जाणारा निवडणूक आयोग गेल्या काही काळापासून आपली लयाला जाऊ लागलेली प्रतिष्ठा पुन्हा संपादन करण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसते. देशातील शक्तिशाली



व्यक्तिमत्त्व असलेले नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याविषयी प्रश्न उपस्थित करण्याची धमक निवडणूक आयोगाने अलीकडेच दाखविली होती, मात्र या मुद्द्यावर कायदा निवडणूक आयोगाच्या बाजूने असेल की नाही, याविषयी शंकाच आहे. पिंजऱ्यातील पोपट असलेल्या सीबीआयची अवस्था आता कळसूत्री बाहुल्यांसारखी होऊ लागली आहे. या संस्थेवर नियुक्ती करण्याच्या क्षमतेचा पुरेपूर फायदा सत्ताधारी पक्ष घेत आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना मद्यधोरणप्रकरणी नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणात सीबीआयने 'आप'च्या तीन महत्त्वाच्या नेत्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राजकीय विरोधकांना नामोहरम करण्याची ही नावीन्यपूर्ण पद्धत आहे. यामुळे दिल्लीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना दर्जेदार शालेय शिक्षण आणि मोहल्ला स्तरावर जलद वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या आपच्या प्रयत्नांत अडथळा आला आहे. भाजप नेहमीच 'पार्टी विथ डिफरन्स' हे बिरुद मिरवताना दिसतो, त्यामुळे हा पक्ष प्रशासनाचे अधिक चांगले पायंडे घालून देईल, असा समज झाला होता. मात्र त्याऐवजी निवडणूक रोख्यांसारखे पायंडे घातले गेले. ज्यात कॉर्पोरेट कंपन्या आपल्या कारखान्यांच्या परिसरातील राजकीय पक्षांना 'पारदर्शी' पद्धतीने आर्थसाहाय्य करतात. देश विरोधी पक्षमुक्त करण्याच्या दिशेने भाजपने टाकलेले आणखी एक नावीन्यपूर्ण पाऊल म्हणजे, विरोधी पक्षांवर राज्यपालांच्या रूपात शब्दश: 'वाघ' सोडणे. यातील सर्वात ताजे उदाहरण माझ्या स्वत:च्याच 'वर्गा'तील- भारतीय पोलीस सेवेतील आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जालन्यातील लाठीचार्ज कुणाच्या आदेशाने

## » लाठीचार्जचे आदेश फडणवीसांनी दिले नव्हते

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि त्यात अनेक आंदोलक जखमी झाले. यात महिला आंदोलकांचाही समावेश होता. यानंतर राज्यभरात मराठा आंदोलक आक्रमक झाले. यावेळी पोलिसांना आंदोलकांवर लाठीचार्ज करण्याचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिल्याचाही आरोप झाला.**





मात्र, आता एका माहिती अधिकार अर्जातून समोर आलेल्या माहितीनुसार ते लाठीचार्जचे आदेश देवेंद्र फडणवीसांनी दिले नव्हते, असं समोर आलं आहे. याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली. ते सोमवारी (२० नोव्हेंबर) माध्यमांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मी यापूर्वीही हे सांगितलं आहे की, अशाप्रकारचा बळाचा वापर करायचा असेल, लाठीचार्ज करायचा असेल, तर त्या ठिकाणचे पोलीस प्रमुख परिस्थिती पाहून निर्णय घेतात. "स्थानिक पोलीस अधिकारी गृहमंत्र्यांना विचारून किंवा पोलीस महासंचालकांना विचारून लाठीचार्जचा निर्णय घेत नाहीत.

त्यामुळे माहिती अधिकारातून जी माहिती समोर आली त्यात काही नवीन आहे असं मला वाटत नाही. जे सत्य आहे तेच बाहेर आलं आहे," असं मत देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केलं. चंद्रशेखर बावनकुळेंच्या व्हायरल फोटोवर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "संजय राऊत यांची विकृत मानसिकता त्यातून दिसत आहे. ते किती उताविळ झालेत हेही त्यातून दिसतं. चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह त्या हॉटेलला थांबले होते. त्यांनी जेथे जेवण केलं ते रेस्टॉरंट आणि बाजूचं केसिनो हे एकत्र होतं. संजय राऊतांनी जाणीवपूर्वक अर्धवट फोटो पोस्ट केला आहे. पूर्ण फोटोत हे स्पष्टपणे लक्षात येतं की, तेथे बावनकुळे, त्यांच्या पत्नी, त्यांची मुलगी, नातू असं सगळं कुटुंब आहे. त्यामुळे ही विकृत मानसिकता कुठेतरी संपवली पाहिजे. इतकी निराशा योग्य नाही," असं मत फडणवीसांनी व्यक्त केलं. व्यक्तिगतपणे लक्ष्य केलं जात आहे यापेक्षा खालची पातळी काय असू शकते. ते असे मॉर्फ केलेले फोटो, कापलेले फोटो पोस्ट करून वाईट आरोप करत आहेत. हे राजकारणाची पातळी खाली नेणंच आहे," अशी टीकाही फडणवीसांनी केली.

### ते समाजामध्ये भांडण लावत आहेत

» स्थानिक पोलीस अधिकारी गृहमंत्र्यांना विचारून किंवा पोलीस महासंचालकांना विचारून लाठीचार्जचा निर्णय घेत नाहीत. त्यामुळे माहिती अधिकारातून जी माहिती समोर आली त्यात काही नवीन आहे असं मला वाटत नाही. जे सत्य आहे तेच बाहेर आलं आहे," असं मत देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केलं. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि त्यात अनेक आंदोलक जखमी झाले. यात महिला आंदोलकांचाही समावेश होता. यानंतर राज्यभरात मराठा आंदोलक आक्रमक झाले. यावेळी पोलिसांना आंदोलकांवर लाठीचार्ज करण्याचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिल्याचाही आरोप झाला. मात्र, आता एका माहिती अधिकार अर्जातून समोर आलेल्या माहितीनुसार ते लाठीचार्जचे आदेश देवेंद्र फडणवीसांनी दिले नव्हते, असं समोर आलं आहे. याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली. ते सोमवारी (२० नोव्हेंबर) माध्यमांशी बोलत होते.

# मी भाजपाचं दुकान बंद करणार नाही : राऊत

## » तुमच्याकडे ईडी आणि सीबीआय असेल, आमच्याकडे 5 व्हिडीओ

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तेलगीने रात्रीत एका बारमध्ये १ कोटी रूपये उधळल्याची माहिती होती. पण, मकाऊमध्ये महाराष्ट्रातील एक व्यक्ती कॅसिनोत साडेतीन कोटी डॉलर उधळतो. म्हणजे खऱ्या अर्थानं अच्छे दिल आलेत, असं म्हणत शिवसेना ( ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना लक्ष्य केलं आहे.**

संजय राऊत यांनी 'एक्स' अकाउंटवर चंद्रशेखर बावनकुळे यांचे कॅसिनोतील फोटो ट्वीट केले होते. यानंतर मी कुटुंबाबरोबर असल्याचं बावनकुळेंनी स्पष्टीकरण दिलं होतं. अशातच संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळेंवर हल्लाबोल केला आहे. संजय राऊत म्हणाले, "मी कुणाच्याही व्यक्तीगत आनंदावर विरजण घालू इच्छित नाही. पण, महाराष्ट्रात सामाजिक परिस्थिती काय आहे? आम्ही एखादी गोष्ट समोर आणल्यानंतर ट्रोलधाडीनं काहीतरी सांगायचं. मात्र, आम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. कुटुंबाबरोबर असल्याचं सांगितलं जात आहे. मग, फोटोत चिनी कुटुंब आहे का? जेवढे खोटे बोलाल, तेवढे फसाल.

माझ्याकडे २७ फोटो आणि ५ व्हिडीओ आहेत. मात्र, आमच्यात माणुसकी आहे. २७ फोटो आणि व्हिडीओ समोर आणले, तर भाजपाला दुकान बंद करावे लागेल. पण, मी ते करणार नाही. कारण, हे दुकान २०२४ पर्यंत चाललं पाहिजे," असा टोलाही राऊतांनी लगावला आहे. मी कधी कुणावरही व्यक्तीगत टिप्पणी करत नाही. आमच्यावर बाळासाहेब ठाकरेंचे संस्कार आहेत. तुमच्याकडे महाराष्ट्रात ईडी आणि सीबीआय असेल. आमच्याकडे मकाऊमध्ये ईडी आणि सीबीआय आहे," असेही संजय राऊतांनी म्हटलं.





शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मकाऊतील कसिनोत बसलेला फोटो शेअर केला. तसेच महाराष्ट्र पेटलेला असताना हे महाशय मकाऊ येथे कॅसिनोत जुगार खेळत असल्याचा आरोप केला. यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. राऊतांच्या या पोस्टवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पहिली प्रतिक्रिया दिली. यात त्यांनी या पोस्टमधून राऊतांची विकृत मानसिकता दिसते, असा हल्लाबोल केला. ते सोमवारी (२० नोव्हेंबर) माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "संजय राऊत यांची विकृत मानसिकता त्यातून दिसत आहे. ते किती उताविळ झालेत हेही त्यातून दिसतं. चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह त्या हॉटेलला थांबले होते. त्यांनी जेथे जेवण केलं ते रेस्टॉरंट आणि बाजूचं केसिनो हे एकत्र होतं."

### खेळले तर बिघडले कोठे?

» १९ नोव्हेंबर... मध्यरात्री... मुक्काम : मकाऊ, वेनेशाईन... साधारण ३.५० कोटी कॅसिनो जुगारात उडवले, असं प्रत्यक्षदर्शी सांगतात. हिंदुत्ववादी असल्याने महाशय द्युत... खेळले तर बिघडले कोठे? ते तेच आहेत ना?" असा खोचक सवालही संजय राऊतांनी उपस्थित केला आहे. व्यक्तिगतपणे लक्ष्य केलं जात आहे यापेक्षा खालची पातळी काय असू शकते. ते असे मॉर्फ केलेले फोटो, कापलेले फोटो पोस्ट करून वाईट आरोप करत आहेत. हे राजकारणाची पातळी खाली नेणंच आहे," अशी टीकाही फडणवीसांनी केली. संजय राऊतांनी जाणीवपूर्वक अर्धवट फोटो पोस्ट केला आहे. पूर्ण फोटोत हे स्पष्टपणे लक्षात येतं की, तेथे बावनकुळे, त्यांच्या पत्नी, त्यांची मुलगी, नातू असं सगळं कुटुंब आहे. त्यामुळे ही विकृत मानसिकता कुठेतरी संपवली पाहिजे. इतकी निराशा योग्य नाही," असं मत फडणवीसांनी व्यक्त केलं.

# अनिल अंबानींच्या कंपनीचं दिवाळं!

## फटका सरकारला बसणार; LIC आणि EPFO पैसा बुडणार?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कर्जाच्या डोंगराखाली दबलेली अनिल अंबानींची (ANIL AMBANI) कंपनी रिलायन्स कॅपिटलच्या विक्रीचा मार्ग मोकळा झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) रिलायन्स कॅपिटलसाठी (RELIANCE CAPITAL) हिंदुजा ग्रुप कंपनी इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेडच्या (IIHL) रिझोल्यूशन प्लॅनला देखील मान्यता दिली आहे. रिलायन्स कॅपिटलच्या संचालक मंडळावर हिंदुजा समूहाच्या पाच प्रतिनिधींचा समावेश करण्याच्या योजनेला आरबीआयने मंजुरी दिली आहे.**

मात्र, हे होत असताना केंद्र सरकारच्या मालकीची असलेल्या भारतीय आयुर्विमा महामंडळ आणि भविष्य निर्वाह निधीचा पैसा बुडणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. हिंदुजा समूहाने एप्रिलमध्ये लिलावाच्या दुसऱ्या फेरीत रिलायन्स कॅपिटलला विकत घेण्यासाठी सर्वाधिक 9650 कोटी रुपयांची बोली लावली होती. हिंदुजाची ऑफर आणि रिलायन्सची रोकड शिल्लक लक्षात घेता, सुमारे 10,000 कोटी रुपयांची वसुली अपेक्षित आहे. याचा अर्थ कंपनीला कर्ज देणाऱ्या बँकांचे मोठे नुकसान होणार आहे. यामध्ये एलआयसी आणि ईपीएफओचाही समावेश आहे. नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी असण्या व्यतिरिक्त,



रिलायन्स कॅपिटल ही अनिल अंबानींच्या वित्तीय सेवा व्यवसायाची होल्डिंग कंपनी होती. रिलायन्स कॅपिटलमध्ये सुमारे 20 वित्तीय सेवा कंपन्या आहेत. यामध्ये सिक्युरिटीज ब्रोकिंग, विमा आणि एआरसी यांचा समावेश आहे. RBI ने 30 नोव्हेंबर 2021 रोजी रिलायन्स कॅपिटलचे बोर्ड विसर्जित केले होते आणि त्याविरुद्ध दिवाळखोरीची कार्यवाही सुरू केली होती. आरबीआयने नागेश्वर राव वाय यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. पहिल्या फेरीत, टोरेंट इन्व्हेस्टमेंटने रिलायन्स कॅपिटलसाठी सर्वाधिक 8640 कोटी रुपयांची बोली लावली होती. हिंदुजा ग्रुपने दुसऱ्या फेरीत सर्वाधिक बोली लावली होती.

### 400 कोटी रुपयांची रोकड शिल्लक

» पण ज्या बँकांनी रिलायन्स कॅपिटलला कर्ज दिले त्यांचे मोठे नुकसान होणार आहे हे स्पष्ट आहे. त्यांना त्यांच्या कर्जाच्या केवळ 43 टक्के रक्कम मिळू शकते. हिंदुजा समूहाने कंपनीसाठी 9,650 कोटी रुपयांची बोली लावली आहे. तसेच कंपनीकडे जवळपास 400 कोटी रुपयांची रोकड शिल्लक आहे. हिंदुजाची ऑफर आणि कंपनीची रोकड शिल्लक लक्षात घेता, केवळ 10,050 कोटी रुपये वसूल होणे अपेक्षित आहे. सप्टेंबर 2021 मध्ये, रिलायन्स कॅपिटलने आपल्या भागधारकांना सांगितले होते की कंपनीवर 40,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. प्रशासकाने 23,666 कोटी रुपयांच्या आर्थिक कर्जदारांच्या दाव्यांची पडताळणी केली आहे.

मात्र टोरेंटने याला आव्हान दिले. सध्या हे प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे आणि त्यामुळे NCLT ने IIHL च्या रिझोल्यूशन प्लॅनला मान्यता दिलेली नाही. या प्रकरणी पुढील आठवड्यात सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे. अशा प्रकारे, कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांना त्यांनी दिलेल्या एकूण कर्जाच्या केवळ 43 टक्के कर्जाची रक्कम मिळू शकेल. एलआयसीचे रिलायन्स कॅपिटलवर सुमारे 3400 कोटी रुपयांचे कर्ज आहे.

# 192 तासांनंतरही बचावकार्य सुरुच!

## टनलबाहेर नातेवाईकांचा आक्रोश सुरुच

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये बोगदा कोसळल्याने 41 मजूर 8 दिवसांपासून अडकले आहेत. शुक्रवारी दुपारी 2 वाजल्यापासून बंद केलेले सिल्क्यरा येथून ड्रिलिंग रविवारी दुपारी 4 वाजता म्हणजेच 50 तासांनंतर पुन्हा सुरू झालं. टनलमध्ये अडकलेल्या मजुरांसाठी येथून आतमध्ये अन्न पाठवण्यासाठी आणखी एक छोटा पाइप ड्रिल करण्यात आला आहे. या दुर्घटनेला आठ दिवस उलटले आहेत. मात्र, अद्यापही मजुरांची सुटका झालेली नाही. जसेजसे जास्त तास उलटत आहेत. तसतसं मजुरांचं मनोधैर्य खचत आहे. आमची लवकर सुटका करा, अशी मजुरांची मागणी आहे.**



### मजुरांच्या सुटकेकडे प्रतीक्षा

» जसजसे दिवस जात आहेत, तसतशी घरातील सदस्यांची चिंताही वाढत आहे. अडकलेल्या अनेक मजुरांचे कुटुंबिय रविवारी सिल्क्यरा येथे पोहोचले. उत्तर प्रदेशच्या मोतीपूर काला येथून सिल्क्यरा येथे आलेल्या लोकांमध्ये अशोक चौधरी यांचाही समावेश आहे. अशोकने सांगितले की, बोगद्यात अडकलेल्या लोकांमध्ये त्याचा मोठा भाऊ संतोष चौधरी देखील आहे. आपल्या भावाला प्रोत्साहन देण्यासाठी तो येथे आला आहे. त्याच्या मोठ्या बहिणीनेही त्याला भावाला घेऊनच घरी येण्यास सांगितलं आहे. अशोकने सांगितलं की, त्याचा मोठा भाऊ संतोष चार महिन्यांपूर्वी गावातील काही तरुणांसह कामानिमित्त येथे आला होता. अपघाताची माहिती कुटुंबीयांना मिळाल्यापासून सगळेच चिंतेत आहेत.

उत्तरकाशी जिल्ह्यातील सिल्क्यरा येथील बोगद्यात अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी आणखी वेळ लागू शकतो. बोगदा बांधकाम तज्ज्ञांच्या मते, बोगदा कोसळल्यानंतर मलबा हटवण्याच्या चुकीमुळे बचावकार्याचा वेळ वाढला आहे. सध्याची परिस्थिती पाहता कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी आणखी पाच दिवस ते एक आठवडा लागू शकतो. जसजसे दिवस जात आहेत, तसतशी घरातील सदस्यांची चिंताही वाढत आहे. अडकलेल्या अनेक मजुरांचे कुटुंबिय रविवारी सिल्क्यरा येथे पोहोचले. उत्तर प्रदेशच्या मोतीपूर काला येथून सिल्क्यरा येथे आलेल्या लोकांमध्ये अशोक चौधरी यांचाही समावेश आहे. अशोकने सांगितले की, बोगद्यात अडकलेल्या लोकांमध्ये त्याचा मोठा भाऊ संतोष चौधरी देखील आहे. आपल्या भावाला प्रोत्साहन देण्यासाठी तो येथे आला आहे. त्याच्या मोठ्या बहिणीनेही त्याला भावाला घेऊनच घरी येण्यास सांगितलं आहे. अशोकने सांगितलं की, त्याचा मोठा भाऊ संतोष चार महिन्यांपूर्वी गावातील काही तरुणांसह कामानिमित्त येथे आला होता. अपघाताची माहिती कुटुंबीयांना मिळाल्यापासून सगळेच चिंतेत आहेत. दरम्यान, बोगद्याच्या आत आणि वर मार्ग बनवणे ही बचावासाठी सर्वात प्रभावी पद्धत आहे. विनोद कुमार, सेवानिवृत्त कार्यकारी संचालक, प्रकल्प आणि बोगदा अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन, नवी मुंबई, हे सिल्क्यरा बोगदा बचाव मोहिमेवर सतत लक्ष ठेवून आहेत. त्यांना बोगदा खोदणे आणि बचाव कार्याचा सुमारे 51 वर्षांचा अनुभव आहे.

# देशात थंडीचा कडाका वाढला!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे देशातील हवामानात बदल झाला आहे. राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढला आहे. तर काही ठिकाणी पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. केरळ, माहे, अंदमान आणि निकोबार बेटांवर आणि तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलवरील वेगळ्या ठिकाणी लक्षणीय पावसाची नोंद झाली आहे. केरळमध्ये कोझिकोड, तिरुवनथपुरम, कोट्टायम, इडुक्की, त्रिशूर तर तामिळनाडूमध्ये नागपट्टिनम, थुथुकुडी, कराईकल या भागात आजही पावसाची शक्यता आहे. राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढताना दिसत आहे. मध्य महाराष्ट्रासह राज्यात इतर भागात गारवा वाढला आहे. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील तापमान कमालीचं घसरलं आहे. मुंबई, ठाणेसह कोकण किनारपट्टीसह गोव्यात गारठा वाढला आहे. छत्तीसगड, तेलंगणा, रायलसीमा, किनारपट्टी आंध्र प्रदेश आणि यानाम आणि अरुणाचल प्रदेशात बहुतांश ठिकाणी कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त आहे. झारखंड आणि आसाम आणि मेघालयमध्ये अनेक ठिकाणी, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटकमध्ये काही ठिकाणी तसेच जम्मू-काश्मीर-लडाख-गिलगिट-बाल्टिस्तान-मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, कोकण आणि गोवा, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल, केरळ आणि माहे, ओडिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा आणि उप-हिमालय पश्चिम बंगाल आणि सिक्कीम तापमान सामान्यपेक्षा कमी आहे. बंगालच्या उपसागरापासून आग्नेय द्वीपकल्पीय भारतापर्यंत तीव्र ईशान्येकडील वारे खालच्या उष्णकटिबंधीय पातळीवर वाहत आहेत. यामुळे बऱ्याच ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे. 20 ते 23 दरम्यान तामिळनाडू आणि केरळमध्ये पावसाचा अंदाज आहे. 21 रोजी आंध्र प्रदेश किनारपट्टी तसेच 22 आणि 23 नोव्हेंबर दरम्यान कर्नाटकमध्ये पावसाची शक्यता आहे.

# माधुरीच्या शिरपेचात मानाचा तुरा!

प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षितच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. ती म्हणजे आता माधुरीला तिच्या चित्रपट क्षेत्रातील योगदानासाठी गौरविले जाणार आहे. ५४ व्या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामधील महोत्सवामध्ये हा पुरस्कार दिला जाणार आहे. केंद्रीय सुचना आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी एक्स वर पोस्ट करत याविषयी अधिक माहिती दिली आहे. त्यांनी त्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, आम्हाला ती गोष्ट सांगताना खूप आनंद होतो आहे की, प्रतिभाशाली आणि आपल्या अभिनयानं चाहत्यांच्या कौतुकाचा विषय असलेली माधुरीचा आम्हाला गौरव करण्याची संधी मिळते आहे. माधुरीनं भारतीय सिनेमा क्षेत्रात जे योगदान दिले आहे यासाठी आम्ही तिचा विशेष सन्मान करतो आहोत. यंदाच्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव समारंभ होणार आहे. असेही त्या व्टिटमध्ये नमूद करण्यात आले आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ माधुरीनं तिच्या अभिनयानं, सौंदर्यानं अन् नृत्यानं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. बॉलीवूडमधील सर्वाधिक प्रभावशाली अभिनेत्रींमध्ये माधुरीचे नाव घेतले जाते.



आजवर माधुरीनं विविध पुरस्कारांवर आपल्या नावाची मोहोर उमटवली असून आता तिच्या शिरपेचात आणखी एका पुरस्काराची भर पडणार आहे. भारतीय आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सवा (आयएफएफआय) च्या पाचव्या महोत्सवाला सुरुवात होणार आहे. गोव्यातील पणजीममध्ये श्यामा प्रसाद मुखर्जी स्टेडियममध्ये हा महोत्सव पार पडणार आहे. केंद्रीय सुचना आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर, नुसरत भरुचा, श्रेया घोषाल, सुखविंदर सिंग, माधुरी दीक्षित, शाहिद कपूर आणि श्रिया सरन आदी सेलिब्रेटी उपस्थित राहणार आहेत.


## उर्फीच्याड्रेसची सोशल मीडियावर चर्चा

ही तिच्या फॅशनमुळे नेहमीच चर्चेत असते. उर्फी ही तिच्या विविध लूकमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करते. नुकताच उर्फीनं तिच्या खास लूकचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. उर्फीच्या या लूकची सोशल मीडियावर चर्चा होत आहे. उर्फीचा एक नवा लूक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. उर्फीनं तिच्या नव्या लूकचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला एक माशी दिसत आहे. त्यानंतर व्हिडीओमध्ये उर्फी ही पांढरी पँट आणि जॅकेट अशा लूकमध्ये दिसत आहे. उर्फीच्या पँट आणि जॅकेटवर बऱ्याच खोट्या माश्या लावलेल्या दिसत आहेत. उर्फी जावेदने तिच्या या नव्या लूकचा व्हिडीओ शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "हे चांगले आहे की, ससुराल सिमर का मालिकेमध्ये मी नव्हते, सिमर वाचली. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "माश्या आता उर्फीला घाबरतील" उर्फीनं याआधी प्लास्टिक, वायर, पिझ्झा आणि काचांपासून तयार केलेला ड्रेस परिधान करुन सोशल मीडियावर फोटो शेअर केले आहेत. उर्फी ही तिच्या अतरंगी स्टाईलमुळे चर्चेत असते. दुर्गा, सात फेरों की हेराफेरी, बेपनाह, जीजी मां, डायन, ये रिश्ता क्या कहलाता है, पंच बीट सीजन 2 आणि कसौटी जिंदगी की या प्रसिद्ध मालिकांमध्ये उर्फीनं काम केलं आहे.बिग बॉस ओटीटीच्या पहिल्या सिझनमधून उर्फी प्रेक्षकांच्या भेटीस आली. या शोमुळे तिला लोकप्रियता मिळाली. MTV SPLITSVILLA गेस्ट कंटेस्टंट म्हणून देखील उर्फीनं सहभाग घेतला होता. ॲक्टिंग, मॉडेलिंग आणि जाहिरातींमध्ये उर्फी काम करते. पण सध्या



## अनुष्काने घातलेल्या ड्रेसची किंमत किती?

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा (ANUSHKA SHARMA) तिच्या सिनेमांपेक्षा अनेकदा पती विराट कोहलीमुळे (VIRAT KOHLI) जास्त चर्चेत येते. अनुष्काने नुकतीच भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया (IND VS AUS) या विश्वचषक सामन्याला (WORLD CUP 2023) हजेरी लावली. या सामन्यादरम्यान अनुष्काने परिधान केलेल्या ड्रेसने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. पण या सामन्यादरम्यान अनुष्काने परिधान केलेला ड्रेस फारच स्वस्त आहे. बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा 300 कोटींची मालकीण आहे. तसेच ती क्रिकेटर विराट कोहलीची (VIRAT KOHLI) पत्नीदेखील आहे. पण तरीही विश्वचषक सामन्यादरम्यान तिने खूपच स्वस्त ड्रेस परिधान केला होता. तिचा हा ड्रेस चाहत्यांच्या पसंतीस उतरला. पण स्वस्त ड्रेस परिधान केल्याने नेटकऱ्यांनी मात्र तिला ट्रोल केलं. 'वर्ल्ड कप 2023'चा अंतिम सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात पार पडला. या सामन्यात भारताचा पराभव झाला. फायनल मॅच दरम्यान अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. विराट कोहलीची पत्नी अनुष्काही हा सामना पाहायला आली होती. त्यावेळी तिने टीम इंडियाला (TEAM INDIA) पाठिंबा दिला. अनुष्का शर्माने फ्लोरल प्रिन्टचा मैक्सी ड्रेस परिधान केला होता. निळ्या आणि पांढऱ्या फ्लोरल प्रिन्ट वाल्या या ड्रेसमध्ये अनुष्का खूपच कंफर्टेबल आणि स्टाइलिश दिसत होती. साईड पॉकेट्समुळे या ड्रेसला एक वेगळाच लूक आला होता. सटल मेकअप आणि मोकळे केस ठेवत अनुष्काने आपला लूक पूर्ण केला. तसेच उन्हात तिने पांढऱ्या रंगाचा सनग्लास घातला होता. अनुष्काच्या ड्रेसची हॉल्टर नेकलाईन होती. तसेच तिच्या ड्रेसवर फुलपाखरू आणि झाडाच्या पानांची प्रिन्ट होती. अनुष्काने परिधान केलेला ड्रेस हा खूपच लोकल होता. 250-300 कोटींची मालकीण असणाऱ्या अनुष्काने फक्त 7,250 रुपयांचा ड्रेस परिधान केला होता. विराट कोहलीची पत्नी तसेच बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री असलेल्या अनुष्काने परिधान केलेल्या ड्रेसची किंमत कोणालाही परवडेल अशी आहे. अनुष्का शर्मा आणि विराट कोहली यांचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. फोटोमध्ये भारताच्या पराभवानंतर अनुष्का शर्मा विराटला पाठिंबा देताना दिसत आहे. अनुष्काने विराटला घट्ट मिठी मारली असून हा फोटो पाहून चाहत्यांच्याही डोळ्याच्या कडा पाणावल्या आहेत.



# धनुषच्या मुलावर पोलिसांची कारवाई!



साऊथ अभिनेता धनुषच्या मुलावर पोलिसांनी मोठी कारवाई केलीय. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी धनुषचा मुलगा यात्रावर पोलिसांनी कारवाई केलीय. काय आहे प्रकरण जाणून घ्या. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पोलिसांनी धनुषचा मुलगा यात्राला दंड ठोठावला असल्याची माहिती समोर आली आहे. चेन्नईच्या पोस गार्डन परिसरात यात्राला सुपरबाईक चालवत असलेला एक व्हिडिओ ऑनलाइन समोर आला आहे. त्यासोबत एक गाईड असुन तो त्याला बाईक चालवण्यासाठी मार्गदर्शन करतोय. धनुषच्या मुलाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये यात्राने हेल्मेट घातले नव्हते आणि त्याच्या दुचाकीची नंबर प्लेट दिसत नव्हती. याशिवाय, यात्राकडे ड्रायव्हिंग लायसन्सही नव्हतं. ज्यामुळे यात्राकडून नियम मोडले गेले. आणि चेन्नई वाहतूक पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केलीय. पोलिसांनी यात्राची आई ऐश्वर्या रजनीकांत यांच्या मार्फत त्याची ओळख पटवली. कारण यात्राने तोंडावर रुमाल बांधला होता. तपासाअंती पोलिसांनी यात्राला वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल 1000 रुपयांचा दंड ठोठावला. एक वर्षापूर्वी धनुष आणि पत्नी ऐश्वर्या रजनीकांत यांनी घटस्फोट घेतला होता. यात्राला वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने पोलिसांनी चांगलीच अद्दल घडवली आणि त्याला दंड ठोठवण्यात आला.

# रणबीर कपूरच्या 'ॲनिमल' चित्रपटाचा ट्रेलर



संदीप रेड्डी वंगा यांनी दिग्दर्शित केलेला रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) स्टारर 'ॲनिमल' (ANIMAL) हा चित्रपट या वर्षातील बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. 'ॲनिमल' या चित्रपटाच्या ट्रेलरची रणबीरचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. 'ॲनिमल' या चित्रपटाच्या मेकर्सनं अखेर या चित्रपटाच्या ट्रेलरची रिलीज डेट जाहीर केली आहे. संदीप रेड्डी वंगा यांनी इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करुन 'ॲनिमल' चित्रपटाच्या ट्रेलरच्या रिलीज जाहीर केली आहे. संदीप यांनी रणबीर कपूरसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोवर "23 नोव्हेंबरला ट्रेलर." असं लिहिलेलं दिसत आहे. दुबईतील बुर्ज खलिफा येथे 'ॲनिमल' या चित्रपटाचा टीझर दाखवण्यात आला.बुर्ज खलिफावर ॲनिमल चित्रपटाचा टीझर पाहण्यासाठी रणबीर कपूर आणि बॉबी देओल हे दुबईमध्ये पोहोचले होते.

# किंग विराट कोहलीचा मोठा निर्णय!

## विराट कोहली लवकरच स्वतःची कंपनी सुरू करणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**वर्ल्डकप फायनल गमावल्यानंतर भारतीय क्रिकेटच्या दीर्घकालीन भागीदारीपैकी एक संपुष्टात आणली आहे. किंग विराट कोहली आणि जेरी मॅग्वायर कॉर्नरस्टोनचे संस्थापक बंटी सजदेह वेगळे झाले आहेत. विभक्त होण्याचे कारण सध्या माहित नाही. परंतु, विश्वसनीयरित्या मिळालेल्या माहितीनुसार किंग कोहली लवकरच स्वतःची कंपनी सुरू करणार आहे. नोंदणी सुद्धा प्रगतीपथावर आहे.**



कोहली आणि बंटी खूप दीर्घ आणि यशस्वी भागीदारीनंतर वेगळे झाले आहेत. गेल्या काही वर्षांत, कॉर्नरस्टोनपासून वेगळे झालेले अनेक क्रिकेटपटू आहेत. रोहित, केएल राहुल, अजिंक्य, शुभमन आदी खेळाडूंचा समावेश आहे, पण विराट आणि कॉर्नरस्टोन अविभाज्य होते, आता ते नातेही संपलं असल्याची उद्योगातील सूत्रांनी माहिती दिली आहे. 2020 मध्ये, करण जोहरच्या मालकीच्या धर्मा प्रॉडक्शनने धर्मा कॉर्नरस्टोन एजन्सी (DCA) नावाच्या कॉर्नरस्टोनसोबत भागीदारी करून प्रतिभा व्यवस्थापन क्षेत्रात प्रवेश केला. तथापि, कॉर्नरस्टोनसह कोहलीची भागीदारी स्वतंत्रपणे चालू राहिली आणि नव्याने स्थापन झालेल्या JV ची त्यात कोणतीही भूमिका नव्हती. "बंटी नव्हे तर कॉर्नरस्टोन चालवणारा कोहली कसा? यावर कायम विनोद असायचा," असेही जाणकार सांगतात. कोहलीच्या व्यावसायिक हितसंबंधांची आणि ब्रँड व्हॅल्यूची आणि मैदानाबाहेर उपस्थितीची काळजी घेणाऱ्या कंपनीच्या व्यवस्थापक आणि संस्थापकांपेक्षा, बंटी हा विराटचा अत्यंत जवळचा मित्र म्हणून ओळखला जात होता आणि क्रिकेटच्या मोठ्या कार्यक्रमांमध्ये तो त्याच्या सोबत असायचा. एकत्रितपणे, त्यांनी प्यूमासोबत 100 कोटी रुपयांच्या साइनअपसह मोठ्या कंपन्यांसोबत करार केले आहेत.

तथापि, बोर्डावरील इतर खेळाडूंपेक्षा कोहलीच्या हितसंबंधांना प्राधान्य देत कॉर्नरस्टोनच्या कुजबुज होत्या. भारताचा माजी कर्णधार कोहली एका दशकाहून अधिक काळापूर्वी कॉर्नरस्टोनमध्ये सामील झाला होता आणि तेव्हापासून बंटीसोबत खूप जवळचा संबंध आहे. या प्रक्रियेत, कॉर्नरस्टोनला रोहित शर्मा, केएल राहुल, अजिंक्य रहाणे, शुभमन गिल आणि इतरांना सोडून द्यावे लागले ज्यांना असे वाटले की कंपनी फक्त विराटवर लक्ष केंद्रित करते, बाकीचे नाही. कंपनीकडे अजूनही पीव्ही सिंधू, सानिया मिर्झा, उमेश यादव, कुलदीप यादव, भारताचा अंडर 19 कर्णधार यश धुल यांसारखे अनेक स्टार खेळाडू आहेत. परंतु त्यांची संख्या पूर्वीच्या तुलनेत कुठेही नाही. रोहित, राहुल, रहाणे आणि गिल पुढे गेले आहेत आणि कॉर्नरस्टोनचा पोर्टफोलिओ, आता धर्मासोबत भागीदारीत, सारा अली खान, जान्हवी कपूर, टायगर श्रॉफ आणि त्यांच्या रोस्टरवर इतरांसह बॉलीवूड भारी आहे.

### बंटी हा विराटचा अत्यंत जवळचा मित्र

गेल्या काही वर्षांत, कॉर्नरस्टोनपासून वेगळे झालेले अनेक क्रिकेटपटू आहेत. रोहित, केएल राहुल, अजिंक्य, शुभमन आदी खेळाडूंचा समावेश आहे, पण विराट आणि कॉर्नरस्टोन अविभाज्य होते, आता ते नातेही संपलं असल्याची उद्योगातील सूत्रांनी माहिती दिली आहे. 2020 मध्ये, करण जोहरच्या मालकीच्या धर्मा प्रॉडक्शनने धर्मा कॉर्नरस्टोन एजन्सी नावाच्या कॉर्नरस्टोनसोबत भागीदारी करून प्रतिभा व्यवस्थापन क्षेत्रात प्रवेश केला. तथापि, कॉर्नरस्टोनसह कोहलीची भागीदारी स्वतंत्रपणे चालू राहिली आणि नव्याने स्थापन झालेल्या ची त्यात कोणतीही भूमिका नव्हती. "बंटी नव्हे तर कॉर्नरस्टोन चालवणारा कोहली कसा? यावर कायम विनोद असायचा," असेही जाणकार सांगतात. कोहलीच्या व्यावसायिक हितसंबंधांची आणि ब्रँड व्हॅल्यूची आणि मैदानाबाहेर उपस्थितीची काळजी घेणाऱ्या कंपनीच्या व्यवस्थापक आणि संस्थापकांपेक्षा, बंटी हा विराटचा अत्यंत जवळचा मित्र.

# हातात बिअर आणि विश्वचषकावर पाय!

## मिचेल मार्शच्या लज्जास्पद कृत्यामुळे चाहते संतापले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अंतिम सामना जिंकत ऑस्ट्रेलियाने (AUSTRALIA) विश्वविजेत्या पदावर नाव कोरलं. भारत (INDIA) विरुद्ध ऑस्ट्रेलियामध्ये अंतिम सामन्याची लढत झाली. पण ज्या विश्वचषकासाठी सारा अट्टाहास सुरु केला होता, त्या विश्वचषकाचा अपमान ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी केला असल्याच्या चर्चा सध्या सोशल मीडियावर सुरु आहेत.**



ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिंस (PATCUMINS) याने मिचेल मार्शचा एक फोटो सोशल मीडिया हँडलवरुन शेअर केला. त्याच फोटोनंतर क्रिकेट फॅन्समधून संताप व्यक्त केला जाऊ लागला. या फोटोमध्ये मिचेल मार्श (MITCHELL MARSH) हा विश्वचषकावर पाय ठेवून बसला असल्याचं पाहायला मिळत आहे. पॅट कमिंस याने शेअर केलेल्या या फोटोमुळे क्रिकेटच्या चाहत्यांमध्ये बराच रोष पाहायला मिळाला. तसेच चाहत्यांकडून सचिनचा विश्वचषकासोबत देखील फोटो शेअर करण्यात आलाय. ज्याची तुलना मार्शच्या या फोटोसोबत केली जातेय. सचिनने या फोटोमध्ये विश्वचषकाच्या ट्रॉफीला जवळ घेतल्याचं पाहायला मिळत आहे. परंतु मिचेल मार्शकडून मात्र या ट्रॉफीचा अपमान झाल्याचं चाहत्यांनी पाहिलं. त्याच्या एका हातामध्ये बियर आणि त्याचे दोन्ही पाय विश्वचषकाच्या ट्रॉफीवर या फोटोमध्ये आहेत. विश्वचषकाची ट्रॉफी सहाव्यांदा उचलल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी ट्रॉफीला जवळ घेत फोटो शेअर केले. पण मिचेल मार्शच्या या फोटोने मात्र ऑस्ट्रेलियांच्या खेळाडूंवर टीकेची झोड उठलीये. ऑस्ट्रेलियाने 2023 चा विश्वचषक जिंकला.पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील संघाने अंतिम फेरीत भारताचा पराभव केला. अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाने सहाव्यांदा विश्वचषक ट्रॉफी जिंकली. मात्र, सोशल मीडियावर एक फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये ऑस्ट्रेलियन अष्टपैलू मिचेल मार्शच्या हातात बिअर आणि त्याचे पाय विश्वचषकावर आहेत. मिचेल मार्शच्या या लज्जास्पद कृत्यामुळे क्रिकेट चाहते संतापले होते. मिचेल मार्शवर क्रिकेट चाहत्यांनी सोशल मीडियावर टीका केली. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी केली. भारताकडून रोहित शर्माने 47 धावांची शानदार खेळी केली. रोहितची खेळी पाहता भारतीय संघ मोठी धावसंख्या उभारेल असे वाटत होते. पण हे होऊ शकले नाही. रोहितचा अप्रतिम झेल ट्रॅव्हिस हेडने घेतला आणि सामना बदलला. कोहलीने 54 धावांची खेळी खेळली असली तरी त्याची अर्धशतकी खेळी मोठ्या सामन्यात फार काही करू शकली नाही. याशिवाय केएल राहुलने 66 धावांची खेळी केली, भारताने 240 धावा केल्या होत्या. यानंतर जेव्हा ऑस्ट्रेलियन संघाने डावाला सुरुवात केली तेव्हा त्यांच्या 3 विकेट लवकर पडल्या पण यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि लॅबुशेन यांनी 192 धावांची भागीदारी करून भारताला सामन्यातून बाहेर काढले. भारताने हा सामना 6 विकेटने गमावला.

### ऑस्ट्रेलियांच्या खेळाडूंवर टीकेची झोड

सचिनने या फोटोमध्ये विश्वचषकाच्या ट्रॉफीला जवळ घेतल्याचं पाहायला मिळत आहे. परंतु मिचेल मार्शकडून मात्र या ट्रॉफीचा अपमान झाल्याचं चाहत्यांनी पाहिलं. त्याच्या एका हातामध्ये बियर आणि त्याचे दोन्ही पाय विश्वचषकाच्या ट्रॉफीवर या फोटोमध्ये आहेत. विश्वचषकाची ट्रॉफी सहाव्यांदा उचलल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी ट्रॉफीला जवळ घेत फोटो शेअर केले. पण मिचेल मार्शच्या या फोटोने मात्र ऑस्ट्रेलियांच्या खेळाडूंवर टीकेची झोड उठलीये. ट्रॅव्हिस हेडला त्याच्या शतकी खेळीसाठी सामनावीराचा किताब देण्यात आला.